आदरणीय सभासद,

विषय : **<u>बँकेचे किमान ३० भाग धारण करणेबाबत.</u>**

आपणांस कळविण्यात येते कि केंद्र सरकारने केलेल्या ९७ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मध्ये झालेल्या बदलांना अनुसरुन बँकेच्या बदललेल्या पोटनियमांना (Bye Laws) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालयाने दि.५.२.२०१४ रोजी मंजुरी दिलेली असून, सभासदांना पोटनियमांमध्ये खालील तरतूदी लागू होत आहेत.

| पोटनियम क्र. | पोटनियम दुरुस्ती |
|---|---|
| १०(१) | बँकेच्या सभासदास त्याच्या खात्यात किमान रु.५००/- एवढी रक्कम असणे आवश्यक आहे. |
| १३(अ) | सभासदाने भाग धारण करण्याची किमान मर्यादा रु.१०००/- म्हणजेच एकूण २० भाग धारण केले पाहिजे. |
| १५ | **<u>क्रियाशील सभासद होण्यास खालील अटी</u>** –<br>- भाग धारण रक्कम रु.१५००/- **आणि**<br>- सर्व प्रकारच्या खात्यात मिळून एकूण शिल्लक रक्कम रु.७०००/- अथवा कर्ज रु.१,००,०००/- इतके असावे. |
| १७ | **फक्त** क्रियाशील सभासदास बँकेच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार आहे.<br>परंतू जर क्रियाशील सभासद थकबाकीदार असेल तर त्यास बँकेच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार राहणार नाही. |
| २१ | सध्या असलेले सभासद व नवीन सभासद यांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने केवायसी (KYC) या मार्गदर्शक तत्वांची वेळोवेळी पूर्तता करणे आवश्यक आहे. |

वरील नमूद केल्याप्रमाणे, आपण बँकेच्या दुरुस्त पोटनियमांची नोंद घेणे व **क्रियाशील सभासद** होण्यास बँकेचे ३० भाग धारण करावे अथवा किमान २० भाग धारण करुन **अक्रियाशील सभासद** व्हावे व आपली KYC ची पूर्तता जसे कि "ओळखीचा पुरावा" व "राहत्या पत्याचा पुरावा" ६ महिन्यांच्या आत करुन घेणे.

वरील पूर्तता करुन घेण्याची अंतिम तारीख दि.३०.९.२०१४ ही राहील. तरी आपण आपली किमान भाग धारण करण्याची मर्यादा व KYC ची **पूर्तता झाली नसल्यास ती करुन घ्यावी** अन्यथा आपले सभासदत्व रद्द करण्यात येईल याची सभासदाने नोंद घ्यावी.

सविनय आभार!

आपला विश्वासू,

सदानंद के.नायक
मुख्य कार्यकारी अधिकारी